# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 &
Presently a State University governed by Maharashtra Public University Act. 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Shyam Khandare
Director
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/662/2023 Dt : 06/11/2023

प्रती,

मा. प्राचार्य / विभाग प्रमुख / रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालय
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषयः— सन २०२३—२४ मधील विशेष शिबीरांच्या आयोजनाबाबत.

महोदय,

युवा कल्यान क्रिडा मंत्रालय, भारत सरकार अंर्तगत रासेयो संहिता भाग ३ अंर्तगत प्रकरण १ २ ३ अन्वये निर्देशित माहीतीनुसार राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर आयोजन **दिनांक ०१/११/२०२३ ते दिनांक ३१/०१/२०२४** पर्यंत करणे आवश्यक आहे. करीता महाविद्यालयाला सुचित करण्यात येते मा. कुलगुरु तथा अध्यक्ष रासेयो यांच्या मान्यतेनुसार खालील बाबीसंदर्भात आपले लक्ष वेधुन नोंद घेण्यासंदर्भात विनंती करण्यात येते आहे.

१) विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या कालावधीत महाविद्यालयीन स्तरीय शिबीराचे प्रस्ताव कार्यालयाला सादर करणे अनिवार्य आहे. शिबीर प्रस्तावाशिवाय आयोजीत शिबीराला अनुदान मान्य करणे शक्य होणार नाही.

२) महाविद्यालयीन स्तरीय शिबीराचे आयोजन महाविद्यालय परिसरात न करता दत्तक ग्रामातच शिबीर आयोजन करणे अनिवार्य आहे. तसेच महाविद्यालय परिसरात शिबीर आयोजनाबाबतचा प्रस्ताव विद्यापीठाला सादर करण्यात येऊ नये. कृपया गांभिर्याने नोंद घ्यावी.

३) आयोजीत शिबीराचा कालावधी पुर्णतः सात दिवसाचा असने अनिवार्य आहे. शिबीराकरीता मंजुर विद्यार्थी संख्येनुसार महिला व पुरुष कार्यक्रम अधिकारीसह शिबीर कालावधीत उपस्थित असने अनिवार्य आहे. रासेयो स्वंयसेवकांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, या करीता शिबीराचे नियोजन विद्यापीठ परिक्षेचा कालावधी लक्षात घेवुन करण्यात यावे.

४) आयोजित शिबीरात दत्तक ग्रामातील ग्रामस्थाचा सहभाग विविध उपक्रमांतर्गत उदा. श्रमदान, बौध्दिक सत्र, व सांस्कृतीक संदेशपर कार्यक्रम इत्यादीमध्ये असावा.

५) शिबिरामध्ये शासन निर्देशित व तसेच विद्यापीठाने सुचित केलेले अभिनव प्रकल्प, सर्वेक्षण, इत्यादीचा समावेश असावा.

६)विद्यापीठ स्तरीय शिबीराचे आयोजनापुर्वी जवळच्या पोलीस स्टेशन तसेच स्थानीक पोलीस पाटिल यांना सुरक्षेच्या दृष्टिकोनातुन पुर्वसुचना देण्यात यावी.

७) शिबीरार्थी शिबीरात सहभागी होण्यापुर्वी त्याचे रासेयो बाबत उदबोधन वर्गाचे आयोजन तसेच शिस्त व नियमाचे पालन करण्यासंदर्भात मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. शक्य तोवर शिबीराच्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन, आभार प्रदर्शन, प्रार्थना, इत्यादी जबाबदारी शिबिरार्थीना देण्यात यावी.

८) महाविद्यालयीन स्तरीय शिबीर कालावधीत लोक सहभाग मिळण्याकरीता दत्तक ग्रामाच्या मध्यभागी किवा वस्तीमध्ये शिबीराचे आयोजन करणे आवश्यक आहे. जणेकरुन ग्रामस्त लोक सहभाग संपुर्ण पणे मिळेल. लोक सहभाग मिळु शकत नसेल तर त्या ठिकानी शिबीराला मान्यता देता येणार नाही. किवा आयोजीत शिबीर मंजुर करता येणार नाही. कुपया नोंद घ्यावी.

९) शिबिराच्या नियमांचे कटाक्षाणे पालन करण्याबाबत व स्वत:जबाबदारीबाबत पुरुष कार्यक्रम अधिकारी व महीला कार्यक्रम अधिकारी शिबीरात सहभागी असणे व पालकाचे हमीपत्र शिबीरार्थीकडुन घेण्यात यावे.

१०) शिबीर स्थळी रासेयो स्वंयसेवक रासेयो बॅच तसेच बौध्दिक सत्रात रासेयो डायरीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

११) शिबीरस्थळी लावण्यात येणाऱ्या बॅनरवर विद्यापीठाचा, महाविद्यालयाचा शिबिर स्थळ व कालावधी आणि आझादी का अमृत महोत्सव लोगो असणे आवश्यक आहे व नामोल्लेख असणे अनिवार्य आहे. तसचे शिबिर स्थळासंदर्भात माहीती व्हावी या करीता मुख्य मार्गावर शिबीर स्थळ निर्देशित फलक लावणे अनिवार्य आहे.

१२) शिबीर आयोजन कार्यक्रम पत्रीका व शिबीर विषयी माहीत रासेयो कार्यालय गोंडवाना विद्यापीठ nssdsw.gug@gmail.com या ई मेल आयडिवर शिबीर सुरु होण्याच्या दोन दिवस पुर्वी पाठविणे अनिवार्य आहे.

१३) शिबीराच्या आयोजनानंतर १५ दिवसाचे आत शिबीराचे लेखे व उपयोगिता प्रमाणपत्र संपुर्ण माहीतीसह कार्यालयाने दिलेल्या विहीत प्रारुपातच सादर करणे अनिवार्य आहे. निर्धारीत कालावधीनंतर प्राप्त हिशेबाचे समायोजन किवा मान्यता देणे शक्य होणार नाही.

१४) विशेष शिबीरच्या कार्यक्रमाचे छायाचित्र जीपीएस मैप कैमरा ने काढावे. अन्य छायाचित्र ग्राहय धरल्या जाणार नाही.

१५) विशेष शिबीर मध्ये मतदान जनजागृती या संदर्भात कार्यक्रमाचे आयोजन करावे. कृपया उपरोक्त बांबीसंदर्भात संबधीत कार्यक्रम अधिकारीना गांभीर्याने नोंद घेण्याबाबत सुचित करावे, ही विनंती.

टिप:—१) राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे आयोजन स्थानिक प्रशासनाची मान्यता घेऊन प्रशासकिय अधिकारी यांना बोलावणे आवश्यक आहे.

२) दिनांक ०८ डिसेंबर २०२३ रोजी सांयकाळी ५. ०० पर्यंत सदर विशेष शिबीराचे प्रस्ताव सादर करावे.

डॉ. श्याम खंडारे
**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

"जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन

राष्ट्रीय सेवा योजना (मंत्रालय कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१.

Email- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२- २२६७९५६५

क्र.- रासेयो-२०२३/प्र.क्र.२०९/साशि-७ दिनांक- ०१ नोव्हेंबर, २०२३

प्रति,

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व विद्यापीठे/ संचालनालये

विषय : सन २०२३-२४ मधील विशेष शिबिरांच्या आयोजनाबाबत.

संदर्भ: १) शासन निर्णय क्रमांक रासेयो-२०२३/प्र.क्र.१००/साशि-७ दि. १७.०५.२०२३

२) शासन निर्णय क्रमांक रासेयो-२०२३/प्र.क्र.१०१/साशि-७ दि.१७.०५.२०२३

उपरोक्त संदर्भ १ व २ च्या शासन निर्णयान्वये विशेष शिबिरांसाठी अनुक्रमे शासन अनुदानित १७८४०० व स्वयंनिर्वाहित ८१००० रासेयो विद्यार्थी संख्या विद्यापीठ/संचालनालयाच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे मंजूर व वितरित करण्यात आली आहे.

राष्ट्रीय सेवा योजना संलग्नित विद्यापीठ/संचालनालय अंतर्गत प्रत्येक घटक महाविद्यालयातर्फे वर्षातून एकदा सात दिवसांचे निवासी विशेष शिबीर महाविद्यालयीन दत्तक घेतलेल्या गावी नोव्हेंबर ते जानेवारी या हिवाळा ऋतू मध्ये आयोजित करण्यात येते. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना २ वर्षामध्ये प्रतिवर्षी १२० तास म्हणजे एकूण २४० तास व दोन्ही वर्षात मिळून एकदा सात दिवसीय निवासी विशेष शिबिर करणे अनिवार्य आहे.

दरवर्षीप्रमाणे सन २०२३-२०२४ मधील राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत वार्षिक सात दिवसीय विशेष शिबिरांचे आयोजन दि. ०१.११.२०२३ ते ३१.०१.२०२४ या कालावधीत करण्यात यावे. रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांनी सर्व कार्यक्रम अधिकारी यांना विशेष शिबिरे आयोजित करण्याबाबत सूचित करावे. तसेच विशेष शिबिरे संपन्न झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल पुढील नमुन्यात रासेयो क्षेत्रिय संचालनालय कार्यालयास तसेच या कार्यालयास पाठवावा.

**Special Camp Report**

| Sr No | University Name | No of Adopted Villages | No of Special Camps organised | No of Volunteers participated in Special Camp | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Male | Female | Total |
| | | | | | | |

(डॉ. निलेश मो. पाठक)
राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

प्रत- मा. क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे.